# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजे वणी (जि.यवतमाळ) येथील ग्रामिण रुग्णालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(१) ४६७७ (२३-१२-२०१४). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वणी (जि.यवतमाळ) परिसरात मलेरीया, डेग्यू इ. आजारांचा फैलाव सुरु असतांनाही तेथील ग्रामिण रुग्णालयात रुग्णांना वेळीच वैद्यकीय उपचार व औषधे उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी स्टाफ, नर्स इत्यादी पदेही रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे न भरण्याची व डेंग्यू, मलेरिया या रोगांवरील प्रतिबंधक औषधे उपलब्ध नसण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे तेथील नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही कार्यवाहीस दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) पदे भरलेली आहे व डेंगू मलेरीया वरील प्रतिबंधक औषधी साठा उपलब्ध आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## फुरुस (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोगय केंद्रात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांच्या गैरकारभाराबाबत

**(२) ६२०४ (०७-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुरुस (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ.आर.बी.सोनावणे हे प्राथमिक आरोग्य केंद्र, जैतापूर, ता.राजापूर येथे कार्यरत असताना दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ रोजी एका रुग्णालयास लावलेल्या सलाईनच्या आय.व्ही. सेटमध्ये मुंग्यासदृश आढळून आल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य समिती सभापती व तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या भेटीच्यावेळी निदर्शनास आले आणि नंतर त्या रुग्णाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशीअंती डॉ.सोनावणे यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडे सादर केला हे खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.आर.बी.सोनावणे यांना म.ना.से (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग करुन कर्तव्यामध्ये कसूर केल्याचा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर डॉ.सोनावणे यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे असा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी १० फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे,

(२) हे खरे आहे,

(३) हे खरे आहे, प्राथमिक चौकशीमध्ये डॉ. आर. बी. सोनवणे, वैद्यकिय अधिकारी हे सकृत दर्शनी दोषी असल्याचे दिसून आल्याने त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना संचालक, आरोग्य सेवा यांनी उप संचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांना देण्यात आल्या आहेत.

(४) अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार डॉ.सोनवणे यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

---

## जव्हार-मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुपोषण आणि बालमृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(३) ३०२२२ (२१-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार-मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुपोषण आणि बालमृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी तसेच कुपोषणाला आळा घालण्यासाठी दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ पासून गरोदर मातेला प्रसूतिपूर्व आणि प्रसूतीनंतर प्रत्येकी तीन महिने रुग्णालयात दाखल करुन तिला सशक्त करण्याबाबत मा.आरोग्य मंत्री यांनी घोषीत केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.आरोग्य मंत्री यांच्या घोषणेप्रमाणे शासनाने कार्यवाहीस सुरुवात केली अथवा नाही,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

गरोदर मातेला प्रसूतिपूर्व व प्रसूतीनंतर ३ महिने प्रत्येकी ३ मातांचे "आशा" कार्यकर्तीद्वारे पाठपुरावा (Tracking) घेऊन काळजी घेण्यात येईल अशा सूचना दिनांक १०.०८.२०१५ रोजी दिल्या आहेत. व प्रसूति गुंतागुंतीची असल्यास सोनोग्राफी व तत्सम निदान करुन तिला प्रसूति दिनांक पूर्वी ७-८ दिवस ॲडमीट करुन घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(२) आरोग्य कर्मचारी व आशामार्फत प्रत्येक गरोदर मातेची काळजी नियमितपणे घेतली जात आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञ पदावर कार्यरत असलेल्या महिला डॉक्टर यांच्या गैरकारभाराबाबत**

**(४) ३५०४१ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञ पदावर कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टर दीड महिन्यांपासून वैद्यकीय रजा टाकून शासकीय निवासस्थानातच खाजगी प्रॅक्टिस करीत असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित वैद्यकिय अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सरकारी सेवेत निवड होवूनही वैद्यकीय सेवेत रुजू न होणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबतत**

**(५) ४०३३३ (१०-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरकारी सेवेत निवड घेवूनही वैद्यकीय सेवेत रुजू न होणाऱ्या ४५० डॉक्टरांना बडतर्फ करण्याची घोषणा मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी हिवाळी अधिवेशनात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ४५० डॉक्टरांना शोधण्यासाठी शासन विशेष मोहिम राबविणार आहे काय,

(३) असल्यास, निवड प्रक्रियेसाठी झालेला खर्च शासन सेवेत रुजू न होणा-या डॉक्टरांकडून करणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर वैद्यकीय अधिकारी ४५० नसून ३९५ असून ते नवीन निवड झालेले डॉक्टर्स नाहीत. ते शासकीय सेवेत असणारे परंतु अनधिकृत गैरहजर असणारे वैद्यकीय अधिकारी आहेत. त्यापैकी ९९ वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आली असून उर्वरीत वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

विशेष मोहिम राबविण्यात येऊन अनधिकृत गैरहजर अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सदर वैद्यकीय अधिकारी हे सेवेतील व सध्या अनधिकृत गैरहजर असणारे अधिकारी आहेत.

(४) सदर अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) कार्यवाही सुरु असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**पी.सी.पी.एन.डी.टी कायद्यामध्ये सुधारणार करण्याबाबत**

**(६) ४३८३४ (०३-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्त्रीभ्रुण हत्येला अटकाव करण्यासाठी आणलेल्या पी.सी.पी.एन.डी.टी. कायद्यामध्ये दुरुस्त्या करुन युनानी शाखांतील डॉक्टरांनाही गर्भपात करण्याचा अधिकार मिळण्याची निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत इंडियन मेडिकल असोसिएशनाने गर्भपाताची ही सुविधा युनानी शाखेला उपलब्ध करुन देण्यास तीव्र विरोध दर्शवला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा शासनाच्या विचाराधीन आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) केंद्र शासनाच्य अखत्यारितील बाब.
पीसीपीएनडीटी कायद्याच्या कलम ३१ (अे) नुसार कायद्यात सुधारणा करण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राळेगाव ग्रामिण रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्र वाढोणा बाजार व झाडगांव व तालुक्यातील इतर केंद्रामध्ये कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत

**(७) ४५७२१ (११-०५-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राळेगाव ग्रामिण रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्र वाढोणा बाजार व झाडगांव व तालुक्यातील इतर केंद्रामध्ये कर्मचारी यांचे रिक्त पद असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास ग्रामिण भागातील गरीब जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या ग्रामिण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे असलेले रिक्तपदे कधी पर्यत भरण्यात येतील,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय, राळेगाव येथील गट अ ते गट ड ची एकूण ३० पदे मंजूर होती. त्यातील २३ पदे भरली आहेत व उर्वरीत ७ पदे रिक्त आहेत.
राळेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व इतर केंद्रातील गट अ ते गट ड ची १५४ मंजूर पदे आहेत. त्यापैकी १०९ पदे भरली असून ४५ पदे रिक्त आहेत.
(२) ग्रामीण रुग्णालय, राळेगाव जि.यवतमाळ येथील गट-अ व गट-ब ची पदे भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे. तसेच गट-क ची रिक्त पदे उपसंचालक आरोग्य सेवा, आरोग्य मंडळ स्तरावरून व गट-ड ची रिक्त पदे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे स्तरावरून भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र (ता.राळेगाव) येथील गट अ व ब ची पदे शासन स्तरावरून व गट क व ड ची पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारवा (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला १०८ सेवांतर्गत ॲबुलन्स उपलब्ध करून देण्याची मागणी**

**(८) ४६५३८ (११-०५-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारवा (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) परिसरातील ३५ ते ४० गावे जोडण्यात आलेल्या पारवा प्राथमिक आरोग्य केंद्राला १०८ सेवांतर्गत ॲबुलन्स उपलब्ध करून देण्याची मागणी परिसरातील नागरिकाकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास पारवा आरोग्य केंद्रा अंतर्गत आठ उपकेंद्र असून जवळपास ४०० ते ५०० रुग्णाची तपासणी आणि ओषधउपचार या ठिकाणी केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पारवा आरोग्य केंद्राला १०८ अंतर्गत ॲबुलन्स उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पारवा प्राथमिक आरोग्य केंद्रापासून नजीक १९ कि.मी. व २६ कि.मी. अंतरावर ग्रामीण रुग्णालय, घाटंजी व उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे रुग्णसेवेसाठी महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेअंतर्गत रुग्णवाहीका उपलब्ध असून, आवश्यकते नूसार प्राथमिक आरोग्य केंद्राला उक्त रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन दिली जाते. माहे फेब्रुवारी २०१४ ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत घाटंजी ग्रामीण रुग्णालय व पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालय येथील रुग्णवाहीकांनी अनुक्रमे २१६० व ३७४८ रुग्णांना सेवा पुरविली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यात कुपोषणामुळे बालमृत्य झाले असल्याचे तक्रारीबाबत**

**(९) ४८९०२ (११-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात अतिरिक्त व मुख्य कार्यकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी २० रिक्त पदे आणि आरोग्य केंद्रात आजारातील रुग्णांवर उपचार करण्याकरीता औषधसाठाक्षेत्र सामूग्री तुटवडयामुळे आरोग्य यंत्रणाच्या आदिवासी क्षेत्रामध्ये कुपोषणसारख्या समस्या सामोर येऊन सुमारे ५४१ बालमृत्यू आढळून आल्याची तक्रार सामाजिक संघटनाच्या प्रतिनिधीनी प्राथमिक आरोग्य केंद्रात केलेल्या पाहणीतून दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले आहे, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, सदरबाबतील सर्वकष चौकशी नुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील आरोग्य केंद्रांसाठी एकूण ६२ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर पदांपैकी केवळ ७ पदे रिक्त असून ५५ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत.

माहे जानेवारी २०१६ अखेर प्राथमिक आरोग्य  केंद्रात पुरेसा औषध साठा उपलब्ध होता.

पालघर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत ग्रामीण कार्यक्षेत्रात माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ मध्ये ० ते ६ वर्ष वयोगटातील एकुण ४५७ बालकांचे मृत्यु  झालेले आहेत.

(२) नाही.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना अंतर्गत मार्च, २०१६ अखेर ४५२ ग्राम विकास केंद्रात (VCDC) ११११६ बालकांना दाखल करण्यात आले. याचप्रमाणे उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पोषण पुनर्वसन केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथे विशेष नवजात काळजी कक्ष स्थापित असून, सन २०१५-१६ या वर्षी एकूण १५८४ भरती मुलांपैकी १३९७ (८८%) मुलांना उपचार देऊन डिस्चार्ज देण्यात आला.

पालघर जिल्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रावरुन संदर्भित केलेल्या आजारी बाळांची प्रकृती स्थिर ठेवण्यासाठी (NBSU) ही केंद्र प्रथम संदर्भ सेवा केंद्रस्तरावर (FRU) स्थापन करण्यात आलेली आहेत.

पालघर जिल्हयातील बालकांमधील कुपोषण कमी करण्यासाठी अर्भक व नवजात बालकांच्या स्तनपानाबाबत मातेस सहा महिन्यांपर्यंत निव्वळ स्तनपान व सहा महिने पूर्ण झाल्यानंतर पोषक आहाराबाबत माहिती व प्रशिक्षण दिले जाते.

पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत  अंगणवाडीस्तरावरील ० त ६ वर्ष वयोगटातील मुलांची वर्षातून २ वेळेस आरोग्य तपासणी करण्यात येते.  तसेच शासकीय व निमशासकीय शाळेतील ६ त १८ वर्ष वयोगटातील मुलांनाही आरोग्य तपासणी कार्यक्रमाचा लाभ होतो.  सदर आरोग्य तपासणी दरम्यान मुलांमध्ये आढळून आलेल्या आरोग्य विषयक समस्या/अडचणीसाठी योग्य ते संदर्भ सेवा व सर्व प्रकारचे वैद्यकीय व शल्य चिकित्सक उपचार पुरविण्यात येत आहेत. मुलांवर केले जाणारे उपचार हे पुर्णत: मोफफत पुरविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धाड (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची होत असलेली गैरसोय

**(१०) ५९७४२ (३०-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाड (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची मनमानी सततची गैरहजेरी आणि रुग्णांना उपचारात येणाऱ्या अडचणींबाबत लेखी पत्र लिहून कारवाईची मागणी दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी राज्याचे आरोग्य संचालक (आरोग्य सेवा) यांना तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याचे सह संचालक आरोग्य सेवा रुग्णालये मुंबई यांनी दिनांक ९ मे, २०१६ रोजी उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ अकोला यांना प्रकरणी उचित कारवाई करून शासनास आणि संचालनालयास तातडीने अहवाल सादर करण्याबाबत लेखी आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपसंचालक आरोग्य आरोग्य सेवा अकोला मंडळ अकोला यांनी याबाबत प्रकरणी अहवाल शासनास वा संचालनालयास सादर केला आहे काय असल्यास याबाबत शासनाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) प्रस्तुत प्रकरणी चौकशी अहवाल जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांनी दि. २२/०९/२०१६ चे पत्रान्वये सादर केला आहे. चौकशीत कोणीही दोषी आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सफाळे (ता.जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(११) ६१५६७ (३०-०८-२०१६). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सफाळे (ता.जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांचे तपासणी साहित्य तसेच औषधे उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयात जवळ जवळ ८० टक्के आदिवासी गोरगरीब नागरिक उपचारासाठी येत असतात परंतु रुग्णलायात यंत्रसामुग्री व औषधे उपलब्ध नसल्यामुळे लोकांना बाहेरुन औषधे आणावी लागतात, तसेच यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्यामुळे रुग्ण कधी कधी मरण पावतो तसेच डॉक्टर गरीब आदिवासी बांधवांशी उध्दटपणे वागत आहेत, ही बाब दिनांक १ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आलक तद्नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जन आरोग्य अभियानामार्फत केलेल्या अभ्यासानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात सरासरी ५३ टक्के औषधांचा साठा शुन्य असल्याची माहिती**

**(१२) ६२१०० (३०-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन नोव्हेंबर, २०१० मध्ये जन आरोग्य अभियानामार्फत ५ जिल्हयातील १० प्राथमिक आरोग्य केंद्र व ५ ग्रामीण रुग्णालयांतून उपलब्धता यावर एक अभ्यास करण्यात आला असल्याचा माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभ्यासानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात सरासरी ५३ टक्के औषधांचा साठा शुन्य असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालाची दखल घेत शासनाने ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय येथे आवश्यक औषधांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) जन आरोग्य अभियानाच्या अहवालात असे नमूद केले असले तरी आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध होता.

(३) राज्यामध्ये दिनांक ७ मे, २०१३ पासून मोफत औषध योजना सुरु आाहे. शा.नि. दि.२६.७.२०१७ अन्वये औषध खरेदीसाठी हाफकीन महामंडळ येथे स्वतंत्र खरेदी कक्ष स्थापन केला आहे. स्थानिक स्तरावर औषध खरेदीसाठी १०-२०% अनुदान वितरीत केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अपंगत्वाचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यासाठी तयार केलेली वेबसाईट बंद पडत असल्याबाबत**

**(१३) ६२५०९ (३०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने अपंगत्वाचे प्रमाणपत्र देताना पारदर्शकता राहावी आणि अपंगांना वेळेत प्रमाणपत्र मिळावे यासाठी तयार केलेली वेबसाईट वारंवार बंद पडत असल्याने प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्याचा प्रकार दिनांक १९ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रक्रियेत सुसूत्रता आणि पादर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने कोणती प्रभावी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच जिल्हयातील उपजिल्हा रुग्णालयात अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे. महाऑनलाईन कडे याबाबत सर्व्हर कपॅसिटी वाढविण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत होता.
(२) शासन निर्णय दिनांक १४.०९.२०१८ अन्वये केंद्र शासनाच्या www.swavalambancard.gov.in या संकेतस्थळावरून दिनांक २.१०.२०१८ पासून दिव्यांगत्व प्रमाणपत्र वितरित करण्यात येत आहेत.
(३) उपजिल्हा रूग्णालय भोर, इंदापूर, बारामती, मंचर व दौंड येथे दिव्यांगत्व प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी अपंग आयुक्त, पुणे यांचेकडून कार्यवाही पूर्ण झालेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत असल्याबाबत**

**(१४) ६८७५४ (१०-०१-२०१७). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), अ‍ॅड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील अनेक मोठया गावांमधील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच जिल्हयातील तळोधी बाळापूर हे मोठे आरोग्य केंद्र असून या केद्रांतर्गत आठ उपकेंद्रांचा समावेश असूनही येथे देखील एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका, पर्यवेक्षिका वाहन चालक अशी अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील तळोधी बाळापूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयात एकुण ५८ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण १०८ पदे मंजुर असून त्यापैकी ९५ पदे भरलेली व १३ पदे रिक्त आहेत.

चंद्रपूर जिल्हयातील उक्त कार्यन्वित ५८ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ८ प्राथमिक आरोग्य केंद्रांना वैद्यकीय अधिकारी संवर्गाचे १ पद मंजूर आहे. त्यापैकी ६ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी पद भरलेले आहे. व २ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी पद रिक्त आहे. उर्वरित ५० प्राथमिक आरोग्य केद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची प्रत्येकी २ प्रमाणे एकुण १०० पदे मंजुर आहेत. त्यापैकी ११ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रत्येकी १ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध आहे. उर्वरित ३९ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रत्येकी २ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र तळोदी बाळापूर, जि.चंद्रपुर येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २८ पदे मंजुर असून २२ पदे भरलेली व ६ पदे सेवानिवृत्ती, राजीनामा इत्यादी कारणाने रिक्त झालेली आहेत. सदर केंद्रात वैद्यकीय अधिकारी यांची २ पदे मंजुर असून १ पद भरलेले आहे.

(३) रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने सेवा पुरविण्यात येत असुन कोणत्याही प्रकारची रूग्णांची गैरसोय होत नाही.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. शासनस्तरावर तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती मार्फत वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट क व ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केद्रांसाठी आधुनिक उपकरणांची खरेदी करण्याबाबत**

**(१५) ७१७५७ (१०-०१-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी अत्याधुनिक उपकरणांची खरेदी होवु शकली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या व्यतिरिक्त, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुविधांसाठी शासनाने १ कोटी ६७ लाख रुपयांचा निधी दिला असून या निधीचे नियोजन झाले नाही व आता हा निधीही शासनाकडे परत जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चीत करुन, शासन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही. रु.५१.५१ लाखाची औषध खरेदी केली असून निविदा कमी दरांच्या आल्याने धोरणात्मक निर्णयासाठी प्रकरण सादर झाल्याने बांधकाम झाले नाही व खर्च होऊ शकला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील जिल्हा सामान्य व ग्रामीण जिल्हा रुग्णालयांतील डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१६) ७७९२९ (१५-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयासह उपजिल्हा व महत्वाच्या ग्रामीण रुग्णालयांमध्ये तब्बल ८३ डॉक्टरांची रिक्त पदांमुळे रुग्णालयाची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील सामान्य रुग्णालयात अस्थिरोग तज्ञच नाही तसेच विविध प्रवर्गातील शेकडो पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने आढावा घेवून सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

बुलढाणा जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा व अधिनस्त १५ आरोग्य संस्थांमध्ये म.वै.आ.से. गट-अ (ग्रेड पे रु.६६००/- व रु.५४००/-) संवर्गाची व वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गाची एकुण १७९ पदे मंजुर असुन १०४ पदे भरलेली व ७५ पदे रिक्त आहेत.

सदर आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नियुक्त तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचेद्वारा रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण ५१४ पदे मंजुर असुन ३६६ पदे भरलेली व १४८ पदे रिक्त आहेत.

सामान्य रुग्णालय बुलढाणा येथील अस्थीतज्ञ गट-अ ची २ पदे मंजूर असून दोन्ही रिक्त आहे. तथापि ट्रॉमा केअर युनिट बडनेरा, जि.अमरावती येथील अस्थितज्ञ यांच्या प्रतिनियुक्तीने सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(३) व (४) म.वै.आ.से. गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ ची रिक्त पदे भरण्याबाबत क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यातील परिचारिकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(१७) ८०९४१ (१८-०४-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुग्णांची अहोरात्र सेवा करणाऱ्या राज्यातील परिचारिकांना आरोग्य विमा संरक्षण नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची सेवा करताना परिचारिकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिचारिकांच्या आरोग्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

शासकीय सेवेतील गट अ ते ड या संवर्गातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देण्यात येते.

(२) अंशत: खरे आहे.

तथापि, रुग्णसेवेदरम्यान संसर्गजन्य आजाराची लागण होऊ नये यास्तव दक्षता घेण्याबाबत आवश्यक ती काळजी घेण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उपसंचालक, आरोग्यसेवा परिमंडळ, औरंगाबाद येथील कागदोपत्री कार्यमुक्त केलेले कर्मचारी प्रत्यक्षात प्रतिनियुक्तीच्याच ठिकाणी कार्यरत असल्याबाबत

**(१८) ८२०५३ (१९-०४-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपसंचालक, आरोग्यसेवा परिमंडळ, औरंगाबाद येथील कागदोपत्री कार्यमुक्त केलेले पाच कर्मचारी प्रत्यक्षात प्रतिनियुक्तीच्याच ठिकाणी कार्यरत असल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधी सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिवांकडे करण्यात आलेल्या तक्रारीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) संबंधित कर्मचारी हे न्यायालयीन प्रकरणे व गट क व ड भरती प्रक्रिया राबविण्यासाठी, तक्रार, विभागीय चौकशीच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता होती त्यामुळे तात्पुरते कामकाज करण्यासाठी निर्देश देण्यात आल्याने सदर कर्मचारी कार्यरत होते. तद्नंतर सदर कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपुर जिल्हयातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदाबाबत**

**(१९) ८३६१९ (२०-०४-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपुर जिल्हयातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, शवविच्छेदक हे पद रिक्त असल्याने योग्य उपचाराचा अभाव, वैद्यकीय योजनांचा लाभ न मिळणे, कुटूंबनियोजन, अंडकोश शस्त्रक्रिया लांबणीवर पडणे यासारखा नाहक त्रास रूग्णांना व त्याच्या नातेवाईकांना होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरजु रूग्णावर योग्य वेळेत उपचार होत नसल्याने व जबाबदार वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त असल्याने रूग्णांला खासगी रूग्णालयात औषधोपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रिक्त पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अशत: खरे आहे.
चंद्रपूर जिल्ह्यातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयामध्ये एकूण ९५८ मंजूर पदे आहेत. त्यापैकी ६१३ पदे भरलेली आहेत. तसेच आयपीएचएस अंतर्गत १२ विशेषज्ञांची पदे कंत्राटी पध्दतीने भरलेली आहेत. त्यामुळे रुग्णांवर आवश्यक उपचार वेळीच करुन त्यांना वैद्यकीय योजनांचा लाभ दिला जातो.
(२) हे खरे नाही.
रुग्णालयातील कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांवर आवश्यक उपचार वेळीच होत असल्याने रुग्णाना खाजगी रुग्णालयात औषधोपचार घ्यावा लागत नाही.
(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु. ६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून ३ वर्षासाठी (दि. ३०.९.२०१२१ पर्यंत) वगळून ती निवडमंडळामार्फत भरण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार सदर पदे

निवडमंडळामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील पदोन्नतीच्या वाटयाची पदे  भरावयाची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु. ५४००) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची ७२३ पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे.  तसेच सद्य:स्थितीत सदर पदे ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत उपसंचालक आरोग्य सेवा यांना संचालनालय स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही उपसंचालक स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नॉन ट्रान्सप्लांट सेंटरची संख्या वाढविण्याबाबत**

**(२०) ८४८२८ (११-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सद्यस्थितीत सुमारे चार हजार रुग्ण किडनीच्या प्रतीक्षेत असून राज्यातील बहुतांशी रुग्णालयांकडे ब्रेनडेड झालेल्या रुग्णांचे अवयव काढून घेण्याचा परवाना नसल्याने सदर परवाना असलेल्या रुग्णालयात संबधित ब्रेनडेड झालेल्या रुग्णाला न्यावे लागत असल्याने बहुमुल्य वेळ वाया जात असल्याची बाब माहे जून २०१७ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, राज्यातील फक्त अवयव काढून घेणाऱ्या रुग्णालयांची (नॉन ट्रान्सप्लांट सेंटरची) संख्या वाढविण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा,१९९४ व सुधारणा २०११ आणि मानवी अवयव प्रत्यारोपण नियमावली २०१४ नुसार अवयव प्रत्यारोपण करण्यात येते.

(२) कॅडेव्हर प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या प्रमाणात वाढ होण्याकरीता व जास्तीत जास्त कॅडेव्हर उपलब्ध होण्याकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी एकूण चार शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ओ.टी./आयसीयु सुविधा असलेल्या खाजगी/सरकारी रूग्णालयांना नॉन ट्रान्सप्लाट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर म्हणून नोंदणी करण्याबाबत आयसीयु/ट्रामा सेंटर रूग्णालय चालकांची बैठक घेऊन त्यांना नॉन ट्रान्सप्लान्ट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर नोंदणी करण्याबाबत सूचना देण्याबाबत व त्याचा पाठपुरावा करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात क्लिनिकल एस्टॅबलिशमेन्ट ॲक्ट अंमलबजावणीच्या अनुषंगाने मसुदा तयार करण्याबाबत

**(२१) ८६१७४ (१६-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सन २०१२ मध्ये क्लिनिकल एस्टॅबलिशमेन्ट ॲक्ट (रजिस्टेशन ॲण्ड रेग्युलेशन) अंतर्गत राज्य शासनाने या कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मसूदा तयार करण्यासाठी माहे डिसेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान १९ सदस्यांची समिती गठित केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने मसुदा तयार करुन राज्य शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर मसुद्याच्या अनुषंगाने राज्यात अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय.

(३) वैद्यकीय आस्थापना विधेयक २०१४ चा मसुदा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून सदर विधेयक राज्यात लागू करण्यापूर्वी विधेयकातील तरतुदींवर संबंधित क्षेत्रातील व्यक्ती वा संस्थांचे स्पष्ट अभिप्राय जाणून घेण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. या मसुद्यावर मंत्रालयीन इतर प्रशासकीय विभागांचे अभिप्राय घेऊन त्यास मा. मंत्री मंडळाची मान्यता घेतल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी विधानमंडळात विधेयक मांडण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणासाठी वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(२२) ८६२६० (११-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या दीड किलो मिटर पट्टयातील झाडांची तोड करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा सखोल अभ्यास असलेल्या पर्यावरण अभ्यासक श्री.कृष्णा तिवारी यांनी झाडांची तोड करु नये असे मत व्यक्त केले असुन तसेच दुसरे पर्यावरण तज्ञ आनंद पेंडारकर यांनी रस्ता रुंदीकरणाला विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरणाचे प्रचंड नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

मुंबई अहमदाबाद महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील वन जमिनीवर होत नसून राष्ट्रीय महामार्गासाठी सन १९६५ मध्ये निर्वणीकरण झालेल्या क्षेत्रात होत आहे. सदर वनेत्तर क्षेत्रातील रुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या ६४७ झाडांचे निष्कासनाकरीता मिरा भाईदर महानगरपालिका उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग यांचेमार्फत परवानगी देण्यात आली असून सद्यस्थितीत ६४७ झाडापैकी ९८ झाडाची तोड करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगोले (जि.सोलापूर) पंचायत समिती क्षेत्रातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२३) ८६३४२ (१९-०८-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगोले (जि.सोलापूर) पंचायत समितीच्या क्षेत्रातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी ६ पदे, आरोग्य सहाय्यक १ पद, आरोग्य सहाय्यिका १ पद, आरोग्य सेवक १४ पदे, आरोग्य सेविका ४ पदे क परिचर १२ पदे अशी एकूण ३८ पदे अनेक वर्ष्यापासून रिक्त असल्याने ती तातडीने भरण्यात यावीत म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मा. आरोग्य मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदे किती दिवसात शासनाकडून भरण्यात येणार आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हयातील सांगोले पंचायत समितीच्या क्षेत्रात एकुण ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित असुन सदर आरोग्य संस्थांमधील मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | १२ | ८ | ४ |
| २ | आरोग्य सेवक | ४० | २७ | १३ |
| ३ | आरोग्य सेविका | ३९ | २८ | ११ |
| ४ | आरोग्य सहाय्यक | ७ | ६ | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | आरोग्य सहाय्यिका | ६ | ५ | १ |
| ६ | परिचर | २५ | १३ | १२ |
| | एकुण | १२९ | ८७ | ४२ |

(२) वैद्यकीय अधिकारी यांची ८७७ रिक्त पदे भरणेबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रायगड जिल्हयातील वैद्यकिय अधिकारी गैरहजर असल्याबाबत

**(२४) ८६८७६ (२१-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील १८ वैद्यकिय अधिकारी गेल्या काही महिन्यापासून अनधिकृतपणे गैरहजर असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदे व गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांमुळे येथील रुग्णांना मुंबईतील रुग्णालयात उपचाराकरिता जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
रायगड जिल्हयातील एक जिल्हा सामान्य रुग्णालय, ५ उपजिल्हा रुग्णालये व ८ ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी गट-अ ची १३२ पदे मंजुर असून त्यापैकी ७१ पदे भरण्यात आली आहेत व ६१ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदामध्ये १७ अनधिकृतरित्या गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.
(२) हे खरे नाही.
गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ठिकाणी अन्य वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यांना इतरत्र जावे लागत नाही.
(३) व (४) गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटीसा देऊन त्यांच्या सेवा समाप्तीची कारवाई सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हिंगोली शासकीय रुग्णालयात मानसोपचार तज्ञांच्या पदासह इतर पदे रिक्त असल्याबाबत

**(२५) ९२४६० (२१-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शासकीय रुग्णालयात मानसोपचार तज्ञांच्या पदासह इतर पदे रिक्त असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी येणाऱ्या रुग्णांचेसमुपदेशन व औषधोपचार कसे होणार हा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सामान्य रुग्णालय, हिंगोली येथील महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे ५४००) मधील सर्वच पदे भरण्यात आलेली असून सदरहू पदामध्ये मनोविकृती चिकित्सक पदांचा समावेश आहे. प्रेरणा प्रकल्प अंतर्गत कंत्राटी तत्वावर समुपदेशनातज्ञ-१, चिकित्सालयीन समुपदेशनतज्ञ-१, समुपदेशन परिचारिका-१ सामाजिक परिचारीका-१ अशी एकूण ४ पदे भरण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे ६६००) मधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण ७२३ रिक्त पदांची जाहिरात दि. १३.०७.२०१८ रोजी प्रसिध्द होवून पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२६) ९२५८३ (१९-०८-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयात ६० हून अधिक गावातील रुग्ण या रुग्णालयाचा लाभ घेत असून सदरहू रूग्णालयातील चारही वैद्यकिय अधिकारी, परिचारीका, क्ष-किरण तज्ज्ञ, औषधनिर्माता पद, डेंटल टेक्निशीयन व अन्य पदे मागील अनेक वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रूग्णालयात असलेल्या अपुऱ्या सुविधेबाबतचे एक सविस्तर निवेदन ग्रामपंचायत, रायपाटण यांनी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्यसेवा, उपसंचालक, आरोग्य विभाग, कोल्हापूर, जिल्हा शल्यचिकित्सक, शासकीय रूग्णालय, रत्नागिरी आदीकडे दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास पाठविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनातील मागण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय रायपाटण,ता.राजापूर,जि.रत्नागिरी येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २८ पदे मंजुर असुन १६ पदे भरलेली व १२ पदे रिक्त आहेत.

सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी गट-अ ची ४ पदे मंजुर असुन ३ भरलेली व १ रिक्त पद आहे.

सदर रुग्णालयात अधिपरिचारिकांची ७ पदे मंजुर असुन ६ पदे भरलेली व १ पद रिक्त आहे. तसेच प्रयोगशाळा सहायक, औषधनिर्माण अधिकारी व प्रयोगशाळा तंत्रज्ञ कार्यरत आहेत. क्ष-किरण तंज्ञाचे पद आंतरमंडळ बदलीने सन २०१४ पासुन रिक्त आहे. डेंटल टेक्निशियनचे पद मंजुर नाही.

गट-ड संवर्गाची ७ पदे मंजूर असुन ४ पदे भरलेली असुन रिक्त ३ पदांवर कंत्राटी सेवेंतर्गत ३ कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राळेगाव (जि.यवतमाळ) येथील ग्रामीण रुग्णालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(२७) ९४१८१ (२१-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) येथील ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर आणि अनेक कर्मचाऱ्याचे पदे रिक्त असल्यामुळे रुग्णाची गैरसोय होत असल्याचे दिनांक २१ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी भागातील गरीब जनतेला मोफत व पारदर्शी आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने राळेगाव येथील ग्रामीण रुग्णालय असून सदर रिक्त पदांमुळे रुग्णावर उपचार होत नाही व रुग्णाना खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय राळेगाव जि.यवतमाळ येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २९ पदे मंजुर असुन त्यापैकी २२ पदे भरलेली व ७ पदे रिक्त आहेत.

ग्रामीण रुग्णालय राळेगाव येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णांची तपासणी करुन त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येतात. तसेच आजाराचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांच्यावर प्राथमिक औषधोपचार करुन त्यांना जवळच्या वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ येथे रुग्णवाहिकेद्वारे संदर्भसेवा देण्यात येते. त्यामुळे ग्रामीण रुग्णालय राळेगाव येथे येणाऱ्या कोणत्याही रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गाची पदोन्नतीची व नामनिर्देशनाची रिक्त पदे भरणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरिता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे. शासन निर्णय दि. २१.०४.२०१५ नुसार सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विभागीय स्तरावर समिती गठीत करुन भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत जिल्हास्तरावर भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून त्याद्वारे गट-क व गट-ड मधील रिक्त पदांवर पात्र उमेदवारांना पदस्थापना देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातून डॉक्टरांच्या भरारी पथकातील डॉक्टरांचे वेतन देण्यात आले नसल्याबाबत

**(२८) ९५५४४ (०६-०१-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सोळा आदिवासी जिल्हयातील अतिदुर्गम भागातील व नक्षलग्रस्त भागातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातून डॉक्टरांच्या भरारी पथकातील डॉक्टरांना मागील पाच महिन्यांपासून वेतन देण्यात आले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या पाच महिन्यापासून वेतन न मिळाल्यामुळे त्यांच्या कुटूंबावर उपासमार होत आहे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील डॉक्टरांना प्रलंबित असलेले वेतन तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी नातेवाईकांना आधार कार्डाची केलेली सक्ती रद्द करण्याबाबत

**(२९) ९५६४३ (०६-०१-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आरोग्य संचालकांनी मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी आधारकार्डाची नातेवाईकांना केलेली सक्ती रद्द करण्याची मागणी एका राजकिय पक्षाच्या वतीने आरोग्य संचालक व संबंधितांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने आधार कार्डाची सक्ती रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र सरकारच्या दि.४.८.२०१७ च्या अधिसूचनेनुसार १ ऑक्टोंबर, २०१७ पासून मृत्यू नोंदणीकरिता मृत व्यक्तीचे आधारकार्ड आवश्यक करण्यात आलेले आहे. ही बाब आरोग्य संचालकांनी राज्यातील सर्व निबंधकांना दि.११.०९.२०१७ रोजीच्या पत्रानुसार कळविली होती. केंद्र शासनाने उपरोक्त अधिसूचनेबाबत दिलेल्या स्पष्टीकरणानुसार मृत्यू नोंदणीसाठी मृत व्यक्तीचे आधार कार्ड उपलब्ध नसेल तर अर्जदाराने तसे घोषणापत्र देणे पुरेसे आहे. तसेच जर मृत व्यक्तिच्या जोडीदाराचे / पालकाचे आधारकार्ड उपलब्ध असेल तर ते ओळखीच्या पुराव्यासाठी सादर करु शकतात. ही बाब राज्यातील सर्व निबंधकांना दि.०२.१२.२०१७ च्या परिपत्रकानुसार कळविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किडनी प्रत्यारोपणासाठी रुग्ण किडनीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(३०) ९६०३३ (२७-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवयवदान चळवळीतून गेल्या तीन वर्षात ७०२ विविध अवयवाचे प्रत्यारोपण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अद्यापही जवळजवळ चार हजार किडनी प्रत्यारोपणाचे रुग्ण किडनीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरजू रुग्णांना किडनी प्रत्यारोपण करुन देण्याचे दृष्टीने शासनामार्फत कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत व त्यानुसार शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ अखेर किडनी प्रत्यारोपण करुन किती रुग्णांना जीवदान दिले आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा,१९९४ व सुधारणा २०११ आणि मानवी अवयव प्रत्यारोपण नियमावली २०१४ नुसार अवयव प्रत्यारोपण करण्यात येते. कॅडेव्हर प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या प्रमाणात वाढ होण्याकरीता व जास्तीत जास्त कॅडेव्हर उपलब्ध होण्याकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी एकूण चार शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ओ.टी./आयसीयु सुविधा असलेल्या खाजगी/सरकारी रूग्णालयांना नॉन ट्रान्सप्लाट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर म्हणून नोंदणी करण्याबाबत आयसीयु/ट्रामा सेंटर रूग्णालय चालकांची बैठक घेऊन त्यांना नॉन ट्रान्सप्लान्ट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर नोंदणी करण्याबाबत सूचना देण्याबाबत व त्याचा पाठपुरावा करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सन १९९५ ते डिसेंबर २०१८ पर्यंत ११,२३४ किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

---

## नाशिक शहरातील काही नर्सिंग होम व रुग्णालयांचे परवान्याचे नूतनीकरण करण्यात आले नसल्याबाबत

**(३१) १०००३१ (०३-०१-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील ३८३ नर्सिंग होम व रुग्णालयांचे परवाने वैद्यकीय विभाग व रुग्णालये यांच्या संगनमताने परवान्याचे नूतनीकरण करण्यात आले नसल्याचे दिनांक ११ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणाबाबत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कोणती कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

रुग्णालयाचे नोंदणी व नुतणीकरण करते वेळेस अग्निप्रतिबंधक दाखला व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचा ना हरकत दाखला सादर न केल्यामुळे सदर रुग्णालयांचे नोंदणी व नुतनीकरण करण्यांत आलेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुमसर (जि.भंडारा) येथील सुभाषचंद्र बोस उपजिल्हा रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञांची रिक्त जागा भरण्याकरिता**

**(३२) १०३५५८ (०६-०१-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर (जि.भंडारा) येथील सुभाषचंद्र बोस उपजिल्हा रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञांची रिक्त जागा भरण्याकरिता स्थनिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक १ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) होय.
(२) सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक पदावर स्त्रीरोगतज्ञ माहे ऑगस्ट २०१७ पासुन नियमित कार्यरत आहे. तसेच सदर रुग्णालयास ग्रामीण रुग्णालय पालांदुर येथील स्त्रीरोगतज्ञ यांची सेवासंलग्न करण्यात आलेली आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरिता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि.२७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.शासन निर्णय दि. २१.०४.२०१५ अन्वये सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता दि.०४.१०.२०१८ च्या पत्रान्वये सर्व परिमंडळांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळवण (जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(३३) १०३७८३ (०६-०१-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवण (जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयात जनरल सर्जन, कान नाक घसा तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ व इतर तज्ञ वैद्यकीय अधिकारी निवासी रहात नसल्याने व काही पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पदे तातडीने भरून रुग्णांना तातडीची सेवा पुरविण्याबाबत नागरिकांनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कळवण उपजिल्हा रुग्णालयात तातडीने रिक्त पदे भरून रुग्णांना, आदिवासींना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) बालरोगतज्ञ वगळून अन्य सर्व विशेषज्ञांची पदे भरलेली आहेत. तसेच बालरोगतज्ञाचे पद प्रतिनियुक्तीने भरण्यात आले असून त्याद्वारे रुग्णांना सेवा पुरविली जात आहे.
(३) वैद्यकीय अधिकारी विशेषज्ञ यांची पदे भरण्यात आलेली असून बालरोगतज्ञाचे पद प्रतिनियुक्तीने भरण्यात आले असून ते नागरिकांना सेवा देतात. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालय, कळवण येथे रुग्णांचे हाल होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच बालरोगततज्ञ हे पद कायम स्वरुपी भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवसंजीवनी योजनेंतर्गत नियुक्त केलेल्या भरारी पथकातील कर्मचा-यांचा वेतन वाढीबाबत**

**(३४) १०५५२१ (०६-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवसंजीवनी योजनेंतर्गत १९९७ पासून शासनाने अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागात घरपोच आरोग्यसेवा पुरविण्याच्या उद्देशाने भरारी पथक सुरु केले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, गेल्या २२ वर्षापासून भरारी पथकातील कर्मचाऱ्यांचा वेतन वाढविण्याचा विचार शासनाने केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासन वेतनवाढीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
सन १९९५ पासून आदिवासी जिल्हयांमध्ये विशेष भरारी पथके स्थापन केली आहे.
(२) हे खरे नाही.
भरारी पथकातंर्गत कार्यरत मानसेवी वैदयकीय अधिकाऱ्यांना आदिवासी विकास विभागातंर्गत जिल्हा नियोजन मंडळाकडील अनुदानातुन प्रति मानसेवी वैदयकीय अधिकाऱ्यास रु.६०००/- मानधन देण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत सन २००९-१० पासून रु.६०००/-, सन २०११-१२ पासुन रु.१२०००/-, सन २०१४-१५ पासुन रु.१५,०००/- व सन २०१६-१७ पासुन रु.१८,०००/- एवढी मानधन वाढ देण्यात आली असून सद्यस्थितीत या मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांना आदिवासी विकास विभागाकडून रु,६,०००/- व NRHM मधून रु. १८,०००/- असे एकूण रु. २४,०००/- मानधन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(३५) १०७०८६ (३१-०३-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील अकोले, राजूर, कोतुळ, समशेरपूर येथील ग्रामीण रुग्णालयातील वैदयकीय अधिकारी व वैदयकीय अधिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे रिक्त असल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले येथील ग्रामीण रुग्णालय अकोले, राजुर, कोतुळ, समशेरपुर या ४ रुग्णालयांना वैद्यकीय अधिक्षकाचे प्रत्येकी १ पद याप्रमाणे एकूण ४ पदे मंजुर असून १ पद भरलेले व ३ पद रिक्त आहेत. तसेच उक्त ४ ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाची प्रत्येकी ३ पदे या प्रमाणे एकूण १२ पदे मंजूर असून १० पदे भरलेली व २ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) म.वै. व आ. से. गट-अ, वर्ग-१ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. राज्यस्तरावरील वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे रु. ५४००/- संवर्गाच्या ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७/१२/२०१८ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या आवारात उभ्या असलेल्या तीन रुग्णवाहिका व एक जीपला आग लागल्याबाबत**

**(३६) ११३४९२ (११-०४-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या आवारात उभ्या असलेल्या तीन रुग्णवाहिका व एक जीपला दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास अचानक आग लागून सदर वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, भविष्यात असे प्रकार होऊ नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

ठाणे जिल्हा रुग्णालयाचे आवारांतील चार निर्लेखित वाहनापैकी एका वाहनांस अचानकपणे आग लागून लागलेली आग पसरुन या चारही निर्लेखित वाहनांना आग लागली, तातडीने अग्नीशमन दलास पाचारण करुन लागलेली आग आटोक्यात आणण्यात आली.

याबाबत उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ, ठाणे यांनी आरोग्य सेवा संचालनालय स्तरावर दि.३१/०७/२०१८ रोजी त्रिसदस्यीय समिती स्थापन केली असून याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) जिल्हा रुग्णालयाच्या आवारात अपुरी जागा असल्याने अशी दुर्घटना परत घडू नये म्हणून उपरोक्त चारही निर्लेखित वाहने ही स्थलांतरीत करण्यात आलेली असून रुग्णालयातील सर्व विविध कक्षामध्ये व परिसरांत फायर फायटर यंत्रणा कार्यान्वित केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वैद्यकीय आस्थापना कायदा करण्यासाठी आरोग्य विभागाने एक समिती स्थापन केल्याबाबत**

**(३७) ११४६५९ (०६-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व खासगी, धर्मादाय आणि सरकारी रुग्णालयाची नोंदणी करणारा वैद्यकीय आस्थापना कायदा करण्यासाठी प्रस्तावित कायद्याच्या मसुद्याचा अभ्यास करुन शासनाला शिफारस करण्यासाठी दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निणर्यान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभागाने एक समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरहू समितीत खाजगी रुग्णालयाचे प्रतिनिधी, भारतीय वैद्यक संघटनेचे प्रतिनिधी, आयएमएमचे प्रतिनिधी, पॅथोलॉजिकल लॅबचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला असून संबधित क्षेत्रातील ग्राहक चळवळीतील कार्यकर्त्यांना डावलण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु समितीत सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर समितीने याबाबतचा अहवाल शासनास किती दिवसात सादर करावयाचा आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मसुदा तयार करण्यासाठी दि.२०.१२.२०१३ अन्वये स्थापन समितीने जाहिर सुनावणी घेऊन मसुदा तयार केला आहे. सबब ग्राहक चळवळीतील व सामाजिक कार्यकर्त्यांचा या समितीत समावेश करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर समितीने शासनास अहवाल सादर केला आहे.

---

**वेल्हे (जि.पुणे) या तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयील पदे रिक्त असल्याबाबत**

**(३८) ११४७४३ (०६-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, पुणे यांना दिनांक १० जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ग्रामीण रुग्णालयात असलेली रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अदयाप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) ग्रामीण रुग्णालय, वेल्हा,जि.पुणे येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २८ पदे मंजुर असुन २२ पदे भरलेली व ६ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु. ५४००/-) ची ३ पदे मंजूर असून सर्व भरलेली आहेत.

वैद्यकीय सेवेशी संबंधित असलेली सरळसेवेची रिक्त पदे १०० टक्के भरण्यास शासन निर्णय दि. १६.०५.२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली असुन त्यानुषंगाने गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत पुढील कार्यवाही सुरु आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी यांची ८७७ रिक्त पदे भरण्याबाबत दि. २७.१२.२०१८ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोमघर (ता.मोखाडा, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात पदे रिक्त असल्याबाबत**

**(३९) ११५३३८ (०६-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोमघर (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात डॉक्टर व अन्य संवर्गातील पदेच भरलेली नसल्यामुळे कोटयवधी रूपये खर्च करून उभारण्यात आलेले आरोग्य केंद्र विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात डॉक्टर व अन्य कोणतेही कर्मचारी नसल्याने त्या परिसरातील गोरगरीबांना उपचारासाठी खोडाळा, सूर्यमाळ किंवा नाशिकला जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात अद्यापी डॉक्टर व अन्य संवर्गातील कोणतीही पदे न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू प्राथमिक आरोग्य उपकेंद्रावर विनाविलंब उपचार होवून रूग्णांना चांगली आरोग्य सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी जिल्हयांतील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने नवीन आरोग्य उपकेंद्रे स्थापन करणेबाबत

**(४०) ११६६२२ (२८-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने १६ आदिवासी जिल्हयांमध्ये १५०० नवीन आरोग्य उपकेंद्रे स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या उपकेंद्रांमध्ये गरजेनुसार अत्याधुनिक यंत्रसामुग्री बसविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असलयास, नंदुरबार येथे बोट अॅम्ब्युलन्स व डॉक्टर कर्मचारी पथक नेमण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,आदिवासी जिल्हयांमध्ये १५०० नवीन आरोग्य केंद्र व नंदुरबार येथे बोट अॅम्ब्युलन्स व डॉक्टर कर्मचारी पथक नेमण्यसाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

तथापि, आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत सद्या राज्यामध्ये अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रांचे टप्याटप्याने आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये रुपांतर केले जाईल.

(२) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानूसार आवश्यक सामुग्री पुरविण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही.

तेथे २ तरंगते दवाखाने व ३ बोट ॲम्ब्युलेन्स कार्यान्वित आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी बनविण्यात येणाऱ्या प्रस्तावाबाबत**

**(४१) ११७०७५ (०६-०८-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांनी उपचाराचा खर्च जमा न केल्यास सदर खर्च जमा होईपर्यंत रुग्णाला रुग्णालयातून सोडण्यात येत नसल्याचे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी बनविण्यात येणाऱ्या प्रस्तावामध्ये रुग्णहिताकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे मार्च २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जनआरोग्य अभियानाकडून आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णहिताकडे दुर्लक्ष न करता राज्यातील खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर नियम प्रस्तावित करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

अशी घटना मुंबई येथील सेव्हन हिल्स रुग्णालयांत सन २०१४ मध्ये घडली आहे. याबाबत मुंबई उच्च न्यायालयात क्रिमिनल जनहित याचिका ४२/२०१४ दाखल झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय हे खरे आहे.

(४) वैद्यकीय आस्थापना विधेयक-२०१४ चा मसूदा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून सदर विधेयक राज्यात लागू करण्यापूर्वी विधेयकातील तरतूदींवर संबंधित क्षेत्रातील व्यक्ती व संस्थांचे स्पष्ट अभिप्राय जाणून घेण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. १८.१.२०१८ च्या शासन

निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीत खाजगी रुग्णालयाचे प्रतिनिधी, भारतीय वैद्यकीय संघटनेचे प्रतिनिधी, आयएमएचे प्रतिनिधी, पॅथॉलॉजिकल लॅबचे प्रतिनिधी इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे. सदर समितीने विधेयकांचा अंतिम मसूदा शासनास सादर केला आहे. त्याची छाननी करुन विधेयक सादर करण्यासाठी विहित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत आरोग्य कर्मचा-यांना केंद्र व राज्य शासनाने २ वर्षापासूनचे थकित वेतन भत्ते व सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४२) ११७१७५ (२८-०७-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत मुंबईसह राज्यभरातील नागरीकांना पोलिओ, लसीकरण, क्षयरोग, कुष्ठरोग अश्या विविध साथीचे रोग नियंत्रण आदी जनजागृती व आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणा-या २९ स्वयंसेवी संस्थेतील १८६ कुटुंब कल्याण आरोग्य कर्मचारी यांना केंद्र व राज्य सरकारने गेले २ वर्षापासूनचे थकित वेतन, ५ वा वेतन आयोगाचे भत्ते व ६ व्या वेतन आयोगाचे सहाय्यक अनुदान अद्याप उपलब्ध करुन देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचा-यांना केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाचे अवर सचिव सौ. वंदना चौधरी यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०१७ रोजी राज्य शासनास दिलेल्या पत्रानुसार या पुढे सहाय्यक अनुदानाचा खर्च राज्य शासनाने स्वःनिधीतून करण्यात यावा असे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचा-यांची वेतना अभावी झालेली गैरसोय व उपासमार रोखण्यासाठी राज्य शासनाने २ वर्षाचे देय थकित वेतन, ५ वा व ६ व्या वेतन आयोगाची अनुदान रक्कम तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

स्वयंसेवी संस्थेतील कर्मचारी हे केंद्र अथवा राज्य शासनाचे नियमित कर्मचारी नसल्याने त्यांना वेतन आयोग लागू नाही. सहाय्यक अनुदान केंद्र शासनाने दि. २५.०५.२०१२ पासून बंद केले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अनुदान देणे केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत सेवेत असलेल्या कर्मचारी व अधिकारी यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(४३) ११७२२९ (२३-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत सेवेत असलेल्या कर्मचारी व अधिकारी यांच्या प्रतिनियुक्ती प्रक्रियेत बदल करण्यात आल्यामुळे प्रतिनियुक्तीबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून इतर प्रलंबित असलेल्या मागण्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयावर अधिकारी व कर्मचारी महासंघाच्या वतीने मोर्चा काढून जिल्हाधिकरी यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मागण्याबाबत योग्य तो निर्णय घण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रतिनियुक्तीबाबत अनिश्चितता झाली हे खरे नाही. तसेच मोर्चा काढला नसून जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन दिले, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्यासाठी शासन निर्णय, दिनांक ०८/०५/२०१८ अन्वये त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नैताळे (ता.निफाड, जि.नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात निवासी वैद्‌यकीय अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत**

**(४४) ११७८४२ (२३-०७-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैताळे (ता.निफाड, जि.नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात निवासी वैद्‌यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असून आर्थिक परिस्थिती नसणा-या रुग्णांना खाजगी दवाखान्यात ओषधोपचारासाठी जावे लागत असल्याची बाब मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, नैताळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात निवासी वैद्यकीय अधिकारी यांचे पद त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र नैताळे, जि.नाशिक येथे वैद्यकीय अधिकारी संवर्गाची दोन पदे मंजुर असुन सद्यस्थितीत दोन पदे भरलेली आहेत. एका पदावर स्थायी वैद्यकीय अधिकारी व एका पदावर बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे.
त्यामुळे रुग्णांना खाजगी दवाखान्यात औषधोपचारासाठी जावे लागत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील सामान्य रुग्णालयामध्ये कायमस्वरुपी सोनोग्राफी तज्ज्ञांची नियुक्ती करण्याबाबत

**(४५) ११९२५८ (२८-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील सामान्य रुग्णालयामधील सोनोग्राफी तज्ज्ञांचे पद रिक्त असून कायमस्वरुपी सोनोग्रोफी तज्ज्ञ नसल्याने स्त्री रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात कायमस्वरुपी सोनोग्राफी तज्ज्ञांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही.

महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड-पे रू.६६००) मधील क्ष-किरणतज्ञाचे पद दि. ३१.१०.२०१७ पासून सेवानिवृत्तीमुळे रिक्त आहे. तथापि रुग्णाची गैरसोय टाळण्या दृष्टीने जेएसएसके कार्यक्रमाअंतर्गत माहे जानेवारी २०१८ पासून क्ष-किरणतज्ञांचे पद भरुन सोनोग्राफी व सिटीस्कन बाबतच्या सेवा नियमितपणे रुग्णांना देण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दि. ३१.०७.२०१८ रोजी क्ष-किरणतज्ञाचे पद भरण्यात आलेले आहे.
(२) महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड-पे रू. ६६००) मधील क्ष-किरणतज्ञाची पदे पदोन्नतीने/सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड-पे रु. ५४००) मधील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने दि. ४.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सर्व उपसंचालक स्तरावर वैद्यकीय अधिकारी कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच राज्यस्तरावरील वैद्यकीय

अधिकाऱ्यांच्या एकूण ७२३ रिक्त पदांची जाहितरात दि. १३.०७.२०१८ रोजी प्रसिध्द होवुन पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) १२१३३७ (२३-०७-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्‌यकिय अधिकाऱ्यांसह आरोग्य सहाय्यक, सेविका तसेच अन्य कर्मचा-यांची ५९ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पदे असल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार राजापूर तालुक्यामधील वैद्‌यकिय अधिका-यांची रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
जिल्हा परिषद रत्नागिरी आरोग्य विभागाकडील राजापूर तालुक्यामध्ये एकुण ९ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्‌यकीय अधिकारी यांची एकुण १८ पदे मंजुर असुन १० पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत. तसेच सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गट-क व गट-ड संवर्गाची एकुण २०९ पदे मंजुर असुन त्यापैकी १४९ पदे भरलेली व ६० पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) वैद्‌यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाच्या रिक्त पदांवर नियमित वैद्‌यकीय अधिकारी भरण्याकरिता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार तेथील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येईल.
शासन निर्णय दि. २१.०४.२०१५ नुसार सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विभागीय स्तरावर समिती गठीत केली असुन त्याद्‌वारे कंत्राटी भरती पक्रिया राबवून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येते.
गट-क व ड ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील सर्व ग्रामीण रुग्णालयांमध्ये सर्पदंश, विंचूदंश व अत्यावश्यक अन्य औषधे व सेवासुविधा पावसाळयापूर्वी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) १२३३८४ (०१-०८-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील सर्व ग्रामीण रुग्णालयांमध्ये सर्पदंश, विंचूदंश व अत्यावश्यक अन्य औषधे तसेच इतर आरोग्य सोयी-सुविधा पावसाळयापूर्वी उपलब्ध करुन द्याव्यात अन्यथा प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरिता संबधित अधिका-याच्या दालनात साप,विंचू सोडण्याचे अनोखे आंदोलन करणार असल्याचा इशारा गाव विकास समितीने माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी यांचे स्तरावरुन आरोग्य संस्थांचा आढावा घेण्यात आलेला असून सदर चौकशीत अत्यावश्यक औषधे साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

(३) हाफकिन बायो फार्मास्युटीकल कॉर्पो.लि. मार्फत १०० प्रकारच्या औषधांचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तसेच अत्यावश्यक औषधी व साहित्य सामुग्रीची गरजेनुसार स्थानिक स्तरावर खरेदी करण्याकरिता दिनांक २५ एप्रिल, २०१८ अन्वये रु.८.२५ कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दिनांक १३.६.२०१८ अन्वये रु.४१.५९ कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहेत.

शासन पत्र दि.१९.५.२०१८ व दि.१७.९.२०१८ अन्वये स्थानिक स्तरावरुन उपलब्ध अनुदानातुन १०% ते २०% निधीतून औषधे खरेदी करण्यास मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हा शासकीय रुग्णालयाला औषधाचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत.**

**(४८) १२३७५८ (२८-०७-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालयाला राज्य शासनाकडून होत असलेला औषधांचा पुरवठा गेल्या दोन वर्षात करण्यात आला नसल्याने रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या निष्काळजीपणा मूळे ओढावलेल्या औषधांच्या टंचाईमुळे अनेक रुग्णांना खाजगी मेडिकलमधून औषधे विकत घेऊन उपचार करुन घ्यावे लागत आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, सातारा जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालयालास औषधांचा पूरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) शासन पत्र दिनांक १९.५.२०१८ व १७.९.२०१८ अन्वये जिल्हा वार्षिक योजनांतर्गत प्राप्त निधीतून १० टक्के ते २० टक्के निधी स्थानिक स्तरावर औषध खरेदीसाठी खर्च करण्यास परवानगी दिली आहे.

त्यानुसार आवश्यकतेनुसार औषध खरेदी करुन पुरवठा करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोंदिया जिल्हयात माता व बाल मृत्यूचा दर शून्य करण्याबाबतचे अभियान अपयशी ठरल्याबाबत

**(४९) १२६३१३ (२८-०७-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात माता व बाल मृत्यूचा दर शून्य करण्याबाबतचे अभियान अपयशी ठरल्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत अर्भक व बाल मृत्यू दारात वाढ झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियान यशस्वी होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

| विवरण | वर्ष २०१७ (एप्रिल ते जुलै) | वर्ष २०१८ (एप्रिल ते जुलै) |
|---|---|---|
| मातामृत्यू | ४ | २ |
| बालमृत्यू | १२२ | १०८ |

बालमृत्यूचे प्रमाण १४ अंकानी कमी झाले आहे.

(२) राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील उपाय योजना करण्यात येतात.

गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थात्मक प्रसूती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्ष योजना, नियमीत लसीकरण कक्ष, एचबीएनसी व इन्टेनसिफाईड

एचबीएनसी, जीवनसत्व "अ" व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रामांतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमांतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमांतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकामार्फत आरोग्य तपासणी व उपचार, करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कडाव (ता.कर्जत, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीच्या कामाबाबत**

**(५०) १३२७८५ (१०-१२-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडाव (ता.कर्जत, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्य रुग्ण व आंतररुग्णांची संख्या जास्त असून या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीचे काम माहे जुलै, २०१७ पासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम पूर्ण न झाल्यामुळे तेथील रुग्णांना विशेषत: महिला व गरोदर रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कडाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधून तयार असून त्या ठिकाणी वैद्यकिय अधिकारी राहत नसल्यामुळे त्या निवासस्थानाची दुरावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१६-२०१७ मध्ये दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, त्यानुषंगाने सदर काम ऑक्टोंबर, २०१८ अखेर पूर्ण झाले आहे.

(२) व (३) हे खरेनाही.

वैद्यकिय अधिकारी निवासस्थानात राहत आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.